अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपील क्र.७५/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/ ७००४ दि.२७/०९/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७५/२०२३

प्रति,

श्री.विश्वमोहन शर्मा
विमाननगर
पुणे-४११०१४

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.विश्वमोहन शर्मा, विमाननगर, पुणे-४११०१४ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.२८/७/२०२३ रोजी (आ.क्र.७६४८, दि.२८/०७/२०२३) अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/५४५८, दि.२२/०८/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २८/७/२०२३ | २८/७/२०२३ | २७/९/२०२३ | २२/०८/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली वारंवार उशिरा उत्तर देणे, अर्ज वर्ग करण्यास उशीर करणे, अर्धवट माहिती देणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे असे प्रकार वारंवार घडत आहेत असे दि.०१/०९/२०२३ (आ.क्र.९३१६ दि.४/९/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०१/०९/२०२३ | ०४/०९/२०२३ | २२/०९/२०२३ | होय | -- |

अपिल दिनांक २५/०९/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.२५/९/२०२३ सकाळी १०.३० वाजता दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले आहे. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "वारंवार उशिरा उत्तर देणे, अर्ज वर्ग करण्यास उशीर करणे, अर्धवट माहिती देणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे असे प्रकार वारंवार घडत आहेत," असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/५४५८, दि.२२/८/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मागितलेली माहिती | उपलब्ध माहिती |
|---|---|---|
| १ | श्रीमती प्रियांक बांते व श्रीमती राजेश्वरी मुरादे या दोन कनिष्ठ अभियंता सन २०१७ पासून २०२३ आजतागायत पथ विभागामध्ये सेवेस आहेत त्यांच्या बरोबर रूजू झालेल्या इतर सर्व अभियंत्याची बदली झाली असून यांची बदली का झाली नाही याची माहिती मिळावी | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ चे पोट कलम (च) मध्ये व्याख्या केलेली माहिती पुरविणे अभिप्रेत आहे. प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. |
| २ | पथ विभागामध्ये भिमराव पवार, भूषण सोनावणे या अभियंता सेवकांची रुजू दिनांकापासून साधारण वर्ष भरात बदली करण्यात आली व श्रीमती प्रियांका बाते व श्रीमती राजेश्वरी मुरादे यांना मात्र सहा वर्षे झाले तरी बदली नाही असा फरक का करण्यात आला आहे याची माहिती मिळावी. | अभिलेख स्वरुपाची अशी माहिती उपलब्ध नाही. |

अपिलार्थी यांनी अभिलेखे उपलब्ध नाही असे नमूद करुन माहिती दिलेली नाही, तसेच काही सेवकांची १ वर्षाचे आत व काही सेवक ५ ते १० वर्ष एकाच खात्यात काम करत असतात अशा प्रकारे तफावत असण्याचे कारण काय? असे सुनावणी दरम्यान प्रश्न उपस्थित केले आहे. विविध संवर्गातील बदल्या होताना शासन धोरणानुसार २०% प्रमाणात बदली करणेबाबत महानगरपालिकचे मान्य धोरण आहे. बदलीस पात्र सेवकांची यादीनुसार बदली झालेले कर्मचारी व अपिलार्थी यांनी मागितलेल्या सेवकांच्या बदली आदेश उपलब्ध करुन देण्यात यावे असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सदर विवेचनाअंती पुढील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहे.

# आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे, महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.७५/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

27/9/23
(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.